माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ८१५/२०२१**

**अपिलार्थी, श्री. शेख सलीम शेख शौकत अली**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
नगर रचना विभाग, महानगरपालिका नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,**
नगर रचना विभाग, महानगरपालिका नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०४.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २९.१०.२०२० | १०.११.२०२० व ०४.१२.२०२० | १९.०१.२०२१ | ०२.०३.२०२३ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २९.१०.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी “१) नागपूर महानगरपालिका हद्दीतील सतरंजीपुरा झोन मध्ये वर्ष २०१५ पासून आजपर्यंत किती बिल्डींगमध्ये पार्किंगची व्यवस्था उपलब्ध आहेत, त्याबद्दल माहिती २) नगर रचना विभागाप्रमाणे किती जागा पार्किंगसाठी उपलब्ध करण्यात येऊ शकते. ३) ही पार्किंग कोणत्या नियमान्वये बहाल करण्यात आली. ४) हया सर्व बिल्डींगचे नंबर आणि लोकेशनबद्दल माहिती" इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र. १ व ४ संतरंजीपुरा झोन क्र. ७ शी संबंधित आहे. तसेच मुद्दा क्र. २ व ३ डी.सी.आर. चे टेबल ८ नुसार या कार्यालयात उपलब्ध असलेल्या नस्तीची एकूण ४ पाने उपलब्ध असून या करीता प्रती प्रत रु. २/- याप्रमाणे एकूण रु.८/- चा भरणा मनपा कोषात करुन कार्यालयीन वेळेत दाखविल्यास आपणास उक्त माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.१२.२०२० रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होऊन **दिनांक १९.०१.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “ मुद्दा क्र. १, २ व ४ ची माहिती बरोबर मिळाली नाही ” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १२.०३.२०२१ रोजी** " माहिती क्र.१,२ व ४ ची माहिती बरोबर मिळाली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १२.०३.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. सदर व्दितीय अपीलावर दिनांक १०.०१.२०२३ व २१.०३.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. मात्र त्यावेळी सुनावणीची कार्यवाही पुर्ण न झाल्याने त्यावर आज दिनांक ११.०४.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, श्री. मंगेश सु. गेडाम उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना एकूण ४ पृष्ठांची माहिती प्रदान केलेली आहे. त्याविरुध्द दाखल प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडून सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, श्री. ऋतुराज जाधव यांनी दिनांक २८.०२.२०२३ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०२.०३.२०२३ अन्वये आदेश पारीत केलेले आहे. त्यात "मुद्दा क्र. १ व ४ मधील अपिलार्थी यांनी अपेक्षिलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची तसेच विस्तृत स्वरुपाची असलेने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(फ) “माहिती” या संज्ञेमध्ये समाविष्ठ होत नाही. सबब, सदर माहिती देणे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता तसेच त्यांचे प्रतिनिधी सहा. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांना देणे बंधनकारक नाही. तथापि, मुद्दा क्र. २ व ३ मधील माहिती ही एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीशी निगडीत असलेने जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता तसेच त्यांचे प्रतिनिधी सहा. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी सदर आदेश प्राप्त झालेनंतर ०७ दिवसाचे आत अपिलार्थी यांना देणेत यावी," असे आदेशित केले. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतुदीशी संबंधित माहिती प्रदान केलेली असल्याचे प्राधिकरणाच्या वतीने सुचीत करण्यात आलेले आहे. कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती यापूर्वीच अपिलार्थीस प्रदान केलेली असल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती यापूर्वीच प्रदान केलेली असल्यामुळे प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.०४.२०२३**

जावक क्रमांक ५८८३ दिनांक ------------------------

M-2023/815-2021/अली

25 SEP 2023